**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 1056 दिनांक : ०२.०४.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवरील कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/५४७५ दि. ०१.०४.२०१९.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर शैक्षणिक संस्था स्तरावरुन मान्यता देणे आवश्यक आहे. याबाबत वारंवार सूचना देऊनही अद्यापही अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज कार्यवाहीसाठी शैक्षणिक संस्था स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती क्लर्क लॉगीन मधे नमूद करुन पुढे प्राचार्य लॉगीन वर पाठवावेत. तसेच प्राचार्य लॉगीनमधून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज दि. १०.०४.२०१९ पर्यंत पुढील टप्प्यावर पाठविणे आवश्यक आहे. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर एकही शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेवू नये.**

**प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नसून, मुदतीनंतर प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.**

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे-विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner